


# कोंबड्यांतील ब्रुडर न्यूमोनिया व अफ्लॉटॉक्सिकॉसिस रोगांचे नियंत्रण

कुक्कुटपालन व्यवसायामध्ये कोंबड्यांचे खाद्य साठवून ठेवण्याच्या अयोग्य पद्धती, खाद्य कोठारामधील दमट वातावरण, कमी-जास्त तापमान, जागा कोरडी नसणे इत्यादी अनेक कारणांमुळे बुरशीजन्य रोगांची लागण होऊ शकते. बुरशीजन्य रोगामुळे पिल्लांची व वाढीवरील पक्ष्यांची मरतुक वाढण्याची शक्यता असते, म्हणूनच हे बुरशीजन्य रोग व त्यावरील उपाय यांची माहिती असणे गरजेचे आहे.

कुक्कुटपालन व्यवसायामध्ये कोंबड्यांना लागणारे खाद्य शेडजवळील कोठारामध्ये साठवून ठेवले जाते; पण खाद्य साठवून ठेवण्याच्या अयोग्य पद्धतीमुळे बुरशीजन्य रोग उदा. ॲफ्लोटॉक्सिकॉसिस, ब्रुडर न्यूमोनिया (ॲस्परगिलॉसिस), ऑकरॅटॉक्सी-कॉसिस यांचा फैलाव होण्याची शक्यता असते. त्याचप्रमाणे खाद्य कोठारामधील दमट वातावरण, कमी-जास्त तापमान, जागा कोरडी नसणे इ. सारख्या अनेक कारणांमुळे बुरशीजन्य रोग कोंबड्यांना खाद्यामार्फत होतात.

**ब्रुडर न्यूमोनिया :**

पिलांना होणारा हा भयानक रोग आहे. ॲस्परगिलस फ्यूमिगेट्स नावाच्या बुरशीमुळे हा रोग होतो. विशेषतः पावसाळ्यात व आर्द्रता जास्त असलेल्या हवामानात ही बुरशी पक्ष्याच्या शरीरात दूषित हवा, खाद्य, पाणी यांमधून प्रवेश करते.

**लक्षणे :** श्वासोच्छ्वासास त्रास, जलद श्वसन, अशक्तपणा तहान लागणे, भुक मंदावणे, धाप लागणे इ. लक्षणे दिसुन पिलाचा मृत्यू चोवीस तासांत होतो.

**उपाय :** या रोगासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणजे स्वच्छता, स्वच्छ कोरडे खाद्य देणे, पिलांना योग्य जागा व स्वच्छ हवा मिळवून देणे, लिटर कोरडे ठेवावे. लिव्हर टॉनिक दिल्यास सुधारण्यास मदत होते.

**ॲफ्लॉटॉक्सिकॉसिस :**

ॲस्परगिलस फ्लाक्स नावाच्या बुरशीपासून तयार झालेले विषारी द्रावण कोंबड्यांच्या खाण्यात आल्यास हा रोग होतो. भिजलेले अगर खराब झालेले खाद्यपदार्थ उदा. शेंगदाणा पेंड, मका, किडलेला गहू वगैरे धान्यांवर झटकन बुरशी तयार होते आणि असे बुरशीयुक्त खाद्य कोंबडीने खाल्ल्यास तिला विषबाधा होते.

**लक्षणे :** पिले मलूल होतात, त्यांची पिसे विस्कटतात, खाद्य खाण्याचे प्रमाण कमी होते, वाढ खुंटते, पिले पांगळी होऊन जातात.

**उपाय :** खराब धान्य खाद्यात वापरू नये, धान्य दमट असल्यास त्यांना कडक उन्हात सुकवावे. संशय आल्यास खाद्य बदलावे व पूरक औषधी म्हणून लिव्हर टॉनिक, जीवनसत्त्वे द्यावीत.

ब्रॉयलर पिल्ले, लेअर पिल्लांपेक्षा प्रकृतीने नाजूक असतात. त्यांचे खाद्य खाण्याचे व शरीरवाढीचे प्रमाण जास्त असते, त्यामुळे त्यांच्या सहा आठवड्यांच्या थोडक्या काळात बुरशीयुक्त खाद्य खाण्यात आले, तर त्यातील विषारी रसायनामुळे यांच्या स्वास्थ्यावर वाईट परिणाम होतो. ब्रॉयलर खाद्यात मका, शेंगदाणे पेंड हे खाद्य घटक मोठ्या प्रमाणावर असतात आणि नेमक्या त्याच पदार्थांना लवकर बुरशी येते, त्यामुळे चांगले वाळलेले पदार्थ मिळवून त्याचे खाद्य बनवणे गरजेचे आहे. खाद्य बनवत असताना शेंगदाणा पेंडऐवजी सोयाबीन केक व चांगला वाळलेला मका खाद्यासाठी वापरणे हितावह आहे. आपण जर कंपनीचे तयार खाद्य घेत असल्यास ते मधून मधून प्रयोगशाळेत तपासावे. कोणत्याही प्रकारचे उपचार करण्यापूर्वी पशुवैद्यकाचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

प्रकाशन

**महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर, संशोधन अनुदान अंतर्गत**

www.mafsu.in

www.knpcvs.in

✻ मार्गदर्शक ✻

**कर्नल प्रा. (डॉ.) ए. एम. पातुरकर**
मा. कुलगुरु, मपमविवि, नागपुर

**डॉ. एस. व्ही. उपाध्ये**
अधिष्ठाता, पशुविज्ञान विद्याशाखा, मपमविवि, नागपुर

**डॉ. एन. व्ही. कुरकुरे**
संचालक संशोधन, मपमविवि, नागपुर

**डॉ. ए. यु. भिकाने**
संचालक विस्तार शिक्षण, मपमविवि, नागपुर

**डॉ. व्ही. डी. आहेर**
सहयोगी अधिष्ठाता
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

✻ लेखक ✻

**डॉ. मृणालीनी बुधे** **डॉ. उमा तुमलाम**
पशुसुक्ष्मजीवशास्त्र विभाग,
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

✻ संकलन ✻

**डॉ. स्मिता आर. कोल्हे**
संशोधन प्रकल्प प्रमुख, पशुवैद्यकीय व पशुसंवर्धन विस्तार शिक्षण विभाग
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

संपर्क : टोल फ्री क्रमांक : १८००-२३३-३२६८ सकाळी १० ते सायं. ६ वा.